**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
*A.Y. 2024-2025*

# ए. व्ही. देशपांडे यांचे लिखाण पुढील पिढीला मार्गदर्शक

## अमरसिंह पाटणकर यांचे प्रतिपादन, 'पत्रकारितेतील माझी ५० वर्षे' या पुस्तकाचे प्रकाशन

वार्ताहर
पाटण

प्रत्येकाच्या अंगी काहीतरी चांगले गुण असतात. ते चांगले गुण आपणाला विकसित करता आले पाहिजेत. 'पत्रकारितेतील माझी ५० वर्षे' या पुस्तकाच्या माध्यमातून ए. व्ही. देशपांडे यांनी आजच्या तसेच पुढील पिढीसाठी आदर्शवत लिखाण करुन ठेवले असून यापुढील पिढीला मार्गदर्शन करणारा हा अमुल्य ठेवा असून ते प्रत्येकाने वाचले पाहिजे. आजच्या सामाजिक परिस्थितीत केवळ वाचन संस्कृतीच समाजाला दिशा देत असून ही संस्कृती जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन कोयना एज्युकेशन सोसायटीचे जॉईंट सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी केले.



पाटण : पुस्तक प्रकाशन प्रसंगी अमरसिंह पाटणकर, डॉ. सागर देशपांडे, प्रा. ए. व्ही. देशपांडे, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे.

ज्येष्ठ पत्रकार व सेवानिवृत्त ग्रंथपाल प्रा. ए. व्ही. देशपांडे यांनी लिहिलेल्या 'पत्रकारितेतील माझी ५० वर्षे' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ. सागर देशपांडे, प्राचार्य डॉ. एस.डी. पवार, प्राचार्य एच. व्ही. देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बबनराव कोळी, संपतराव देसाई, सी. डी. केळकर, बा. मा. सुतार यांचा सत्कार करण्यात आला.

सागर देशपांडे म्हणाले, प्रा. ए.व्ही.देशपांडे यांनी पाटणसारख्या तालुक्याच्या ठिकाणी राहून तालुका पत्रकार संघ, ग्रंथालय संघ तसेच साहित्य परिषद यासारख्या संस्थांच्या उभारणीत मोलाची भूमिका बजावली. ग्रंथपाल म्हणून पूर्णवेळ नोकरीची जबाबदारी सांभाळतानाही सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य तसेच पत्रकारिता अशा सर्व कार्यक्षेत्रात एक निःस्वार्थी कार्यकर्ता म्हणून नेहमीच समन्वयाची भूमिका पार पाडली.

प्रा. ए. व्ही. देशपांडे म्हणाले, हे पुस्तक जशी माझी आत्मकथा आहे, तशी ती केवळ माझी एकट्याची नसून या दीर्घ वाटचालीतील सोबती, सहकाऱ्यांची आहे. त्याचप्रमाणे हा पाटण तालुक्याच्या चाळीस वर्षांच्या सांस्कृतिक जीवनाचा धावता आलेखही आहे. तत्कालीन कालखंडात नागोजीराव पाटणकर वाचनालय हे संस्कारपीठ सोडले तर पाटण गावात करमणुकीची, मनोरंजनाची साधनं नव्हती. मात्र शाहिरी, कथा, पोवाडे, गाणी, नाटक, मेळ्यातून वावरणारी येथील प्रतिभावंत माणसं प्रबोधनात्मक विचारांची चालती–बोलती संस्कारपीठ होती.

प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. सौ. निशा फाटक यांनी परिचय करून दिला. संजय इंगवले यांनी प्रास्ताविक केले.अँड. सौरभ देशपांडे यांनी आभार मानले.